

# स्नोरकेल डायव्हिंग

गेल्या लेखात आपण स्कूबा डायव्हिंगबद्दल माहिती घेतली. त्यावरून सगळ्यांच्या लक्षात आलेच असेल की यासाठी थोडेसे तरी प्रशिक्षण घ्यायला हवे. शिवाय या खेळासाठी हवेची टाकी आणि इतर अनेक गोष्टींची गरज असते. या खेळामध्ये व्यक्ती पाण्यामध्ये बऱ्यापैकी खोल जाते. पण कित्येक व्यक्तींना फक्त पाण्याच्या पृष्ठभागापासून थोडे खोल जाण्याची इच्छा असते. अशांना स्नोरकेलिंग उपयुक्त ठरते. म्हणून आता या लेखात आपण स्नोरकेलिंगबद्दल माहिती घेणार आहोत.

आपण पाण्याच्या पृष्ठभागाच्या खाली पाण्यात गेलो की आपल्याला श्वासोच्छवास करता येत नाही. कारण त्यासाठी हवा लागते. ही हवा ज्या नळीद्वारे आपल्याला मिळते तिला स्नोरकेल असे म्हणतात. तिचे एक टोक पाण्याच्या पृष्ठभागावर असते ज्यातून आपल्याला हवा मिळू शकते. पाण्यामध्ये जातांना तोंडावर व्यवस्थित बसेल असा मुखवटा घालावाच लागतो. नळीचे दुसरे टोक ह्या मुखवट्याच्या आतल्या माउथपीसमध्ये घातलेले असते. आणि अशा प्रकारे आपल्याला पाण्याच्या पृष्ठभागावरील हवा मिळून पाण्याखाली तोंडावाटे श्वासोच्छवास करता येतो. पण यावरून लक्षात येते की स्नोरकेल पाण्याच्या पृष्ठभागाच्या खाली गेली तर त्यात पाणी शिरून श्वासोच्छवास करता येणार नाही. आणि यामुळेच स्नोरकेल डायव्हिंगमध्ये आपण पाण्यात खूप खोल जाऊ शकत नाही.

स्नोरकेलचा आकार इंग्रजी वर्णाक्षर जे सारखा असतो. पूर्वीच्या साध्या स्नोरकेलमध्ये आता खूप सुधारणा झाल्या आहेत. स्नोरकेलच्या खालच्या टोकाजवळ फ्लेक्स ट्यूब नावाची लवचिक ट्यूब बसवतात ज्यामुळे स्नोरकेल मुखवट्यात व्यवस्थित बसू शकते. स्नोरकेलच्या वरच्या टोकाजवळ स्प्लाश गार्ड बसवलेला असतो ज्यामुळे पाण्यात पोहत असलेल्या व्यक्तींनी उडवलेल्या पाण्यापासून संरक्षण होते. स्नोरकेल पाण्यात बुडाली तर तिच्यात पाणी भरू नये म्हणून एका फ्लोट व्हाल्वची सोय केलेली असते. आणि असे असूनही जर तिच्यात पाणी भरले तर खालच्या टोकाला पर्ज व्हाल्व बसवलेला असतो ज्यामुळे पाण्याचा निचरा भराभर होतो.याशिवाय आणखी काही गोष्टी असतात ज्यामुळे स्नोरकेलिंग करणाऱ्या व्यक्तीला फायदा होतो. स्कूबा डायव्हिंगमध्ये

पाण्यात जलद फिरण्यासाठी कल्ले असतात. तसेच कल्ले स्नोरकेलिंगमधेही वापरता येतात. शिकाऊ किंवा अननुभवी स्नोरकेलर्स स्नोरकेल व्हेस्ट नावाचे जाकीट वापरू शकतात ज्यामुळे पाण्याच्या पृष्ठभागाखाली असून तरंगण्यासाठी त्यांना मदत होते. स्नोरकेलमध्ये साधारण तीन प्रकार आहेत.

**१) सेमी ड्राय**

यामध्ये स्प्लाश गार्ड आणि पर्ज व्हाल्व हे दोन्ही असतात. पण स्नोरकेल पाण्याखाली गेली असता त्यामध्ये पाणी भरू शकते. म्हणून अशा प्रकारची स्नोरकेल शिकाऊ लोकांसाठी योग्य नसते. ज्यांना डायव्हिंगचा पूर्वानुभव आहे अशांना ती योग्य असते. काही स्कूबा डायव्हर्स, तसेच पाण्याखाली श्वास रोखून संचार करणारे फ्रीडायव्हर्स आणि पाण्याखाली भाल्यासारखे आयुध घेऊन माशांची शिकार करणारे स्पिअरफिशर्स अशा स्नोरकेलचा वापर करतात.

**२) ड्राय स्नोरकेल**

यामध्ये सेमीड्राय स्नोरकेलमध्ये असतात त्या सर्व गोष्टी असतात. आणि शिवाय एक फ्लोट व्हाल्व असतो ज्यामुळे स्नोरकेल पूर्णपणे पाण्यात बुडाली तरी तिच्यात पाणी भरत नाही. स्नोरकेलचा हा एकच प्रकार आहे ज्यामध्ये आपण श्वासोच्छवास करीत असलेल्या नळीत पाणी शिरू शकत नाही आणि त्यामुळे हा प्रकार शिकाऊ  लोकांसाठी योग्य असतो. तथापि या नळीत हवा भरून राहिलेली असल्याने तरणशक्ती वाढल्याने व्यक्ती पाण्यात जास्त खोल जाऊ शकत नाही. त्यामुळे ड्राय स्नोरकेल स्कूबा डायव्हर्स, फ्रीडायव्हर्स आणि माशांची शिकार करणारे स्पिअरफिशर्स यांच्यासाठी योग्य नसते.

**३) वेट स्नोरकेल**

ह्या स्नोरकेलस्ना जे-ट्यूब स्नोरकेल्स किंवा जे-टाईप स्नोरकेल्स असे म्हटले जाते. स्नोरकेलचा हा मूलभूत प्रकार समजला जातो. यामध्ये स्नोरकेलमध्ये पाणी भरू नये यासाठी  आणि पाणी भरल्यास त्याचा लगेच निचरा व्हावा यासाठी विशेष सोय नसते. त्यामुळे ही स्नोरकेल शिकाऊ लोक वापरू शकत नाहीत. परंतु बरेच फ्रीडायव्हर्स, स्पिअरफिशर्स आणि अनुभवी स्नोरकेलर्स या स्नोरकेलच्या साध्या रचनेमुळे आणि त्यामुळे पाण्यात कमीतकमी विरोध मिळत असल्याने अशी स्नोरकेल वापरणे पसंत करतात.

**स्नोरकेलिंगसाठी घ्यावयाची काळजी**

स्नोरकेलिंगसाठी पोहता येणे आवश्यक नसले तरी येत असल्यास त्याचा पाण्यामध्ये इकडे तिकडे हिंडण्यास फायदा होतो. पाण्यात पोहतांना फक्त पायांनी पाणी मागे ढकलले आणि आपले हात अंगाबरोबर ठेवले तर कमी उर्जा खर्च होते. तसेच पोहतांना पाणी फार उडवता कामा नये. नाहीतर मासे दूर पळतात आणि त्यांचे नीट निरीक्षण करता येत नाही. स्नोरकेलचा वापर करून श्वासोच्छवास करतांना प्रत्येक वेळी श्वास सोडला की थोडी हवा नळीत शिल्लक राहते आणि तीच श्वासावाटे फुफुसात घेतली जाते. यामुळे रक्तात कार्बन डाय ऑक्साईड वाढत जातो. आणि हे योग्य नसते. हे टाळण्यासाठी खोल श्वासोच्छवास (डीप ब्रीदिंग) करावा लागतो. त्यासाठी त्याचा सराव करावा लागतो. स्नोरकेलिंग करतांना कधीकधी नळीत पाणी शिरून ते तोंडात येते. असे झाल्यास जोरात श्वास सोडून ते पाणी बाहेर ढकलून देता येते. आणि बाकीच्या पाण्याचा निचरा करावा लागतो.

व्यवस्थित काळजी घेतली आणि अनुभवी लोकांचे मार्गदर्शन घेतले तर स्नोरकेलिंग, स्कूबा डायव्हिंग यांचा आनंद मनमुराद लुटता येतो. पुढच्या लेखात माहिति घेऊ राफ्टींगची.

◆

**डॉ. वर्षा जोशी**
varshajoshi611@gmail.com